# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना कमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम कमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालयीन विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२—२१६५९४ E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com

गो.वि./म.वि /283/२०१९ दिनांक: 28/01/२०१९

## परीपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य,
गोंडवाना विद्यापीठाशी
संलग्नित सर्व महाविद्यालय,
(जिल्हा —चंद्रपुर व गडचिरोली )

विषय :— महाडीबीटी पोर्टलवर संस्थांनी नोंदविलेल्या शुल्कामध्ये बदल न करणेबाबत
संदर्भ :—१.क्र.उशिनाग/शिष्य—२०१८/डीबीटी/६७२ दिनांक १४/०१/२०१९

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयांन्वये आपणांस कळविण्यात येते कि, शिक्षण संचालनालय उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या कार्यालयाकडुन विद्यापीठाला महाडीबीटी पोर्टलवर संस्थांनी नोंदविलेल्या शुल्कामध्ये बदल न करणेबाबत चे पत्र प्राप्त झालेले असुन सोबत संलग्नित केलेल्या पत्रानुसार महाविद्यालयाने पुढील कार्यवाही घ्यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठाला कळवावा.

आपला विश्वासु

(डॉ. व्ही.सी. सिलारे)
प्र.उपकुलसचिव(म.वि)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्रः—संलग्नित उपरोक्तप्रमाणे.

... विद्यापीठ, ...
वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय
आवक क्र. 816 दि. 16.01.19
जावक क्र........ दि...............

आवक क्र. 821 : 16.1.19

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/शिष्य-२०१८/डीबीटी / 602 दि. १४/०१/२०१९

**तात्काळ अत्यंत महत्वाचे**

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण.

**विषय :- महाडीबीटी पोर्टलवर संस्थांनी नोंदविलेल्या शुल्कामध्ये बदल न करणेबाबत...**

संदर्भ:- शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र. २७८/तांशि-४, दि. १०.०१.२०१९

उपरोक्त विषयाबाबत शासनाच्या संदर्भिय परिपत्रकाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी महाडीबीटी पोर्टलमध्ये संस्थांनी भरलेल्या शुल्काची पडताळणी करताना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत संस्थेने जरी पूर्वीच्या शिक्षण शुल्क समितीने मंजूर केल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये देय असलेले ८ टक्के वाढ विचारात घेऊन महाडीबीटी पोर्टलवर शिक्षण शुल्क भरले नसल्यास त्यामध्ये कोणताही बदल करण्यास परवानगी न देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. मात्र शिष्यवृत्तीचा दुसरा हप्ता वितरीत करण्यापूर्वी ज्या ज्या संस्थांनी शुल्क बदलाबाबतची मागणी केली आहे हे विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक यांच्याकडून तपासून त्याप्रमाणे प्रत्यक्षात संस्थेने विद्यार्थ्यांकडून घेतलेल्या शुल्काप्रमाणे महाडीबीटी पोर्टलवर बदल करण्याची संधी देण्यात येत आहे. याबाबत आपल्या विभागातील सर्व संबंधित शैक्षणिक संस्थांना सूचना देण्यात याव्यात. तसेच त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सोबत :- संदर्भिय शासन परिपत्रकाची प्रत.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :- १. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.
३. प्राचार्य, संबंधित सर्व महाविद्यालये यांना तात्काळ कार्यवाहीसाठी संबंधित विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक यांचे मार्फत.



Scanned by CamScanner